कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्प संच क्र. ६ च्या सुधारीकरणास व आधुनिकीकरणासाठी महानिर्मिती कंपनी मर्यादित यांना प्राप्त झालेल्या अनुदान रक्कमेच्या समायोजनाबाबत वित्तीय वर्ष २०१७-१८

महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. निधिवि-२०१७/प्र.क्र.-११२/(२)/ऊर्जा-३
मंत्रालय मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १६ फेब्रुवारी ,२०१८

संदर्भ :- १) शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र. ७५/अर्थ-३, दि. १८/४/२०१७
२) शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३० जून, २०१७
३) शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ०८ ऑगस्ट, २०१७
४) महानिर्मिती कंपनीचे पत्र क्र. DOF/MSPGCL/GOM/No. १४७०५, दि. १५.१२.२०१७
५) शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. ०६ फेब्रुवारी, २०१८

प्रस्तावना :-

कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्प संच क्र. ६ (सुधारीकरण व आधुनिकीकरण) जागतिक बँकेच्या सहकार्याने उभारण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी सन २०१७-१८ या वर्षाकरिता मागणी क्र. के-६ योजना सांकेतांक २८०१२८७६ अंतर्गत रु.१४.३६ कोटी इतक्या अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. जागतिक बँकेकडून सन २०१७-१८ मध्ये अनुदान स्वरुपात रु.४,७४,५४,७३९/- इतकी रक्कम महानिर्मिती कंपनीस परस्पर प्राप्त झाली आहे. सदर रक्कम महालेखापाल कार्यालयाने ८६५८ ११० CAORB Suspens या निलंबन या लेखाशिर्षाखाली दर्शविली आहे. सदर रक्कम पुस्तकी समायोजनाने योग्य त्या लेखाशिर्षा खाली दर्शविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महानिर्मिती कंपनीच्या कोराडी युनिट क्र. ६ (आधुनिकीकरण व नुतनीकरण) प्रकल्पास केंद्र शासनाच्या पुढाकाराने जागतिक बँकेकडून मंजूर झालेल्या व महानिर्मिती कंपनीस परस्पर प्राप्त झालेल्या अनुदानाची रक्कम रु.४,७४,५४,७३९/- (रुपये चार कोटी चौ-याहत्तर लाख चौपन्न हजार सातशे एकोणचाळीस फक्त) इतकी रक्कम पुस्तकी समायोजनाने वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली अनुदानाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आली आहे त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा करावी.

३. वरील बाबींचा खर्च "मागणी क्र. के-६ २८०१ वीज,०५ पारेषण व वितरण,१९९ अशासकीय संस्थाना सहाय्य,(००),(००) (०१) एमएसपीजीसीएल ला कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्प संच क्र.६ च्या नुतनीकरणासाठी व आधुनिकीकरणासाठी सहाय (२८०१२८७६)३१ सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) या लेखाशिर्षा खाली खर्ची टाकावा व तो सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदी मधून समायोजित करण्यात यावा.

४. सदर रक्कमेचे पुस्तकी समायोजन महालेखापाल मुंबई यांच्या अखत्यारित व अधिकारात करण्यात येत असल्याने या रक्कमेचे देयक तयार करण्यात येवू नये.

५.   महालेखापाल (लेखा व अनुज्ञेता / लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१ यांनी त्यांच्या अखत्यारित व अधिकारात रु. ४,७४,५४,७३९/- (रु. चार कोटी चौ-याहत्तर लाख चौपन्न हजार सातशे एकोणचाळीस फक्त) चे पुस्तकीसमायोजन करुन शासनास तसे कळवावे.

६.   महाराष्ट्र विनियोजन विधेयक २०१७/ परिपत्रक क्र. अर्थसंकल्प, २०१७/ प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.०४.२०१७ मधील परिच्छेद ७ ते १८ या परिच्छेदांची पूर्तता होत आहे व परिशिष्ट मधील सर्व १ ते १० अटींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच दि. ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र. ३ नुसार या लेखाशिर्षाखाली होणारा खर्च ७० % च्या मर्यादेत आहे.

७.   वित्त विभागाच्या दि. १८.०४.२०१७ च्या परिपत्रकान्वये मासिक विवरण पत्रानुसारचा निधी जून ते डिसेंबर या कालावधीमध्ये पुढे / मागे ओढून घेण्याची सुविधा दिली आहे. सदर परिपत्रकान्वये निधी वितरणाचे अधिकार प्रशासकीय विभागास देण्यात आले आहेत त्यास अनुसरुन सदर निधी वितरीत करण्यात येत आहेत.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८०३०६१६५७२५६७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vilas Mahadeorao Rajurkar

Digitally signed by Vilas Mahadeorao Rajurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=83469494bac86099a320f3e14bf8421ee9d2b48e34447 0b76ea2595df04951b4, serialNumber=02c5c00269dd48836be0d9939bdff848a9ff1f1a9f d195baf3a104d09b0817d9, cn=Vilas Mahadeorao Rajurkar
Date: 2018.03.06 16:58:20 +05'30'

(वि.म.राजुरकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत -:

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विदयुत सुत्रधारी कंपनी मर्यादित, हॉंगकॉंग बिल्डींग , ४ था मजला.एम ,जी,रोड . फोर्ट, मुंबई-२३
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई-४०००२०.
४) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई-४०००२०.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -२, नागपूर.
६) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/ विधान सभा, विधानभवन, मुंबई
७) अधिदान व लेखा अधिकारी, (अराप / रालेवि-१), मुंबई.
८) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
९) वित्त विभाग, /(अर्थसंकल्प-१३ / साधनसंपत्ती /साऊ / व्य-१६) मंत्रालय, मुंबई, ३२
१०) निवडनस्ती (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.